महात्मा फुले कृषि विद्यापीठ,
राहुरी, जिल्हा अहमदनगर.

दुरध्वनी क्रमांक - ०२४२६-२४३३६६ / २४३२२१ / २४३२१६ फॅक्स क्रमांक - ०२४२६ - २४३८१६
Website- www.mpkv.ac.in E-mail dradmnmpkv@rediffmail.com

जा.क्र. प्रशासन/ब-१/लिनिटं /वर्ग-४/ ४३४८ /२०१९ दिनांक : २६ / १२ /२०१९

**वाचा :** १) विद्यापीठ निर्णय क्र. प्राधिकारण -२ (१२२)/ २१०/२०१७, दिनांक २९.११.२०१७
२) विद्यापीठ निर्णय जा.क्र.एमटीजी-२ (१२२)/ १८१ /२०१९, दिनांक १३.१२.२०१९
३) जा.क्र.प्रशासन / ब-१ / लिनिटं / वर्ग-४ / ११२५ / २०१९, दिनांक २४.०४.२०१९

# परिपत्रक

विषय : लिपीक-नि-टंकलेखक या पदाची शैक्षणिक अर्हता पूर्ण करणाऱ्या वर्ग-४ संवर्गातील विविध पदांवर कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांची माहिती मागविण्याबाबत...

महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे विविध कार्यालयांतर्गत कायम आस्थापनेवरील वर्ग-४ संवर्गातील ज्या कर्मचाऱ्यांनी दिनांक ३१.१२.२०१९ रोजीला वर्ग-४ संवर्गात विद्यापीठातील ३ वर्षाची नियमित सेवा पुर्ण केलेली आहे. अशा कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांची माहिती सोबतच्या प्रपत्रात **दिनांक ०७.०१.२०२०** पर्यत आवश्यक त्या शैक्षणिक व अनुभवाच्या प्रमाणपत्रांच्या सत्यप्रतीसह या कार्यालयास पाठविण्यात यावी. तसेच अशा कर्मचाऱ्यांचा दिनांक ३१.१२.२०१९ पर्यंतचा मागील ३ वर्षातील कामकाजाबाबतचा अहवाल व मागासवर्गीय कर्मचाऱ्यांबाबत जातवैधता प्रमाणपत्र त्यांचे प्रस्तावासोबत पाठविण्यात यावे. तसेच ज्या कार्यालयाची माहिती **निरंक** आहे त्यांनी माहिती पाठवून नये.

तसेच, संदर्भ क्र.३ वरील या कार्यालयाने परिमंडलीत केलेल्या परिपत्रकाच्या अनुषंगाने यापुर्वी परिचयपत्रे / सेवातपशिल विषयक माहिती सादर केलेल्या कर्मचाऱ्यांना देखील या परिपत्रकान्वये पुनःश्च माहिती सादर करणे आवश्यक असुन भविष्यात माहिती अभावी पदोन्नती लाभापासून वंचित राहणाऱ्या कर्मचाऱ्यांची कोणतीही सबब ग्राहय धरली जाणार नाही याची गांभीर्याने नोंद घ्यावी.

लिपीक-नि-टंकलेखक या पदाकरिता पदोन्नतीद्वारे नियुक्ती देण्यासाठी विद्यापीठ निर्णय क्र.प्राधिकरण-२ (१२२)/२१०/२०१७, दिनांक २९.११.२०१७ व विद्यापीठ निर्णय जा.क्र.एमटीजी-२ (१२२)/ १८१ /२०१९, दिनांक १३.१२.२०१९अन्वये निश्चीत केलेली शैक्षणिक व अनुभवासंबंधीची अर्हता ही खालीलप्रमाणे आहे.

१. संविधिक विद्यापीठाची कोणत्याही शाखेतील पदवी किंवा शासनाने त्याच्याशी समतुल्य म्हणून घोषित केलेली अन्य कोणतीही अर्हता.
२. महाराष्ट्र राज्य परिक्षा परिषदेचे किंवा महाराष्ट्र शासनाच्या शिक्षण विभागाचे शासकीय परिक्षा मंडळाचे मराठी टंकलेखकनाचे किमान ३० श.प्र.मि.वेग मर्यादेचे किंवा इंग्रजी टंकलेखकनाचे किमान ४० श.प्र.मि.वेग मर्यादेचे शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र किंवा संगणक टंकलेखनाचे प्रमाणपत्र धारण केले पाहिजे.

३. महाराष्ट्र शासनाच्या माहिती व तंत्रज्ञान संचालनालयाने वेळोवेळी विहित केलेले संगणक संचलन प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक राहील.

४. गट ड मधील पद धारण करणाऱ्या व किमान तीन वर्षांपेक्षा कमी नाही इतकी नियमित सेवा पूर्ण करीत असलेल्या, उपरोक्त अ.क्र.१ ते ३ मध्ये विहित केलेली शैक्षणिक अर्हता धारण करणाऱ्या कर्मचाऱ्यांना जेष्ठता अधिन पात्रता या निकषानुसार पदोन्नतीने नियुक्ती देण्यात येईल.

५. दिनांक ०६ जुन, २०१७ पुर्वी गट-ड मधील पद धारण करणाऱ्या आणि ज्यांनी माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षा उत्तीर्ण केली आहे, अशा कर्मचाऱ्यांचा देखील अ.क्र.४ अंतर्गत पदोन्नतीसाठी दिनांक ०६ जुन, २०१७, पासून पुढील पाच वर्षांपर्यत विचार करता येईल.

सोबत : वरीलप्रमाणे अ- प्रपत्र

**कुलसचिव**
मफुकृवि, राहुरी

- सर्व कार्यालय / योजना प्रमुख, मफुकृवि, राहुरी कार्यक्षेत्र
  त्यांना कळविण्यात येते की, सदर परिपत्रक लिपीक-नि-टंकलेखक या पदाची अर्हता व अनुभव धारण करणाऱ्या वर्ग-४ संवर्गातील विविध पदांवर कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांना दाखवून त्यांची स्वाक्षरी घ्यावी. अन्यथा भविष्यात याबाबत प्रशासकीय अडचण निर्माण झाल्यास संबंधीत कार्यासन कर्मचारी व कार्यालय प्रमुखांवर नियमानुरुप प्रशासकीय कार्यवाहीस पात्र राहतील.
- मा.कुलगुरु यांचे स्वीय सहाय्यक, मफुकृवि, राहुरी यांना माहितीसाठी